THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 28TH APRIL 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख ४ माहे एप्रिल सन १८९८.

नंबर २३९३.—सन १८९२ चा मुंबईचा आबकारी आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट यावरून सुधारलेल्या सन १८७८ च्या मुंबईच्या आबकारी आक्टाचें कलम १८ अ, पोट-कलम ३, यावरून दिलेले अधिकार चालवून आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल हे असें फर्मावितात कीं सदर्हू पोट-कलमांतील ठरावांत सांगितलेल्या कारणांसाठीं त्या ठरावांअन्वयें चालू सालांत ह्मणजे सन १८९८ सालांत ज्या मुदतीमध्यें लैसेन्साची, परवान्याची अगर पासाची जरूरी लागणार नाहीं ती मुदत, रकान्यांत नमूद केलेल्या जाहीरनाम्यावरून ठरविलेल्या प्रदेशाच्या, यांत खालीं निर्दिष्ट केलेल्या, भागांच्या हद्दींच्या आंत तारीख ३० माहे एप्रिल सन १८९८ पर्यंत आहे, ह्मणजे—

सन १८९३ चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १ ला, पृष्ठ २९१, यावर प्रसिद्ध केलेला जाहीरनामा नंबर १९८५.

### ठरविलेल्या क्षेत्राचे भाग.

(अ) सगळा ठाणें जिल्हा (रेव्हिन्यू डिस्ट्रिक्ट).

(ब) कुलाबा जिल्हा (रेव्हिन्यू डिस्ट्रिक्ट) यांतील खालापूर पेट्यासहित सगळा कर्जत तालुका.

आलीजा धि रैट ऑनरेबल धि गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मॉन्टीथ,

चीफ् सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

Registered No. B. 1